सकाळ

विद्यार्थ्यांना दिले सायबर सुरक्षेचे धडे

नागपूर, ता. ५ : कुर्वेज न्यू मॉडेल पब्लिक स्कूल येथे क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षणातून सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी शासकीय न्यायवैद्यक विज्ञान संस्था यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमात शासकीय न्यायवैद्यक विज्ञान संस्थेचे विद्यार्थी कुणाल मेश्राम आणि ऋतुजा गिरी यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. वाढत्या ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार, आर्थिक फसवणूक, बनावट संदेश व लिंक, ओळख चोरी, खाते हॅक करणे, तसेच क्यूआर कोडद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून बचाव कसा करावा याबाबत त्यांनी माहिती दिली.

Nagpur, Nagpur-Today
06/08/2026 Page No. 3